P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट दिनांक - ०१/०३/२०२३

### दि.२८/०२/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण २६० /२०२३ भा दं वि क ४९८(अ), ३७७, ३२३, ५०४, ५०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०१ जानेवारी २०१५ पासून आज पावेतो रा . एल बिल्डींग, प्लॅट नंबर ८ स्वप्ननगरी, एकतानगर चाकण ता.खेड जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २८/०२/२०२३ रोजी १९.५७ वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी वय ३८ वर्षे |
| आरोपी | :- | दिलीप सोमनाथ सावळे वय ३७ वर्षे रा.एल बिल्डींग, प्लॅट नंबर ८ स्वप्ननगरी, एकतानगर चाकण ता. खेड जि.पुणे सध्या रा.रोहन इनक्युव पलॅट नं.९ दापोडी पुणे १२<br>**आरोपी अटक नाही.** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे पती आरोपी यांनी वेळोवेळी लग्न झालेपासुन फिर्यादी यांना शारिरीक व मानसिक त्रास दिला असुन त्यांची इच्छा नसताना देखील त्यांचे सोबत तोंडावाटे व गुदद्वारामार्फत अनैसर्गिकरित्या शारिरीक संबंध ठेवण्यासाठी भाग पाडले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मपोउपनि साळुंखे ९०७५६८१३३७ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | चिखली १२९/२०२३ भादवी कलम ३५४, ३५४ (ड) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | १.जानेवारी २०२३ मध्ये (नक्की तारीख आठवत नाही) दुपारी ०३.०० वाजताचे सुमारास ज्ञानदिप शाळेसमोर सहयोग नगर, रुपीनगर पुणे व दि. २७/०२/२०२३ रोजी रात्री ११.३० वाजताचे सुमारास सहयोगनगर, तळवडे पुणे येथे फिर्यादी यांचे घरासमोर |
| गुन्हा दाखल | :- | दि २८.०२.२०२३ रोजी २०/३२ वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी वय २० वर्षे |
| आरोपी | :- | सनी लोखंडे राह.गोसावी हॉस्पीटलचे जवळ, सहयोगनगर, रुपीनगर पुणे पुर्णनाव माहीत नाही<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी तळवडे येथुन त्यांचे केटरिंग चे काम करुन घरी येत जात असताना फिर्यादी या ज्ञानदिप शाळेच्या समोर आल्यावेळी फिर्यादी यांचे ओळखीचा आरोपीत हा फिर्यादी यांना म्हणाला कि, थांब मला तुझ्याशी बोलायचे आहे, तु मला खुप आवडतेस, माझे तुझ्यावर प्रेम आहे. तेव्हा फिर्यादी यांनी त्यास स्पष्ट नकार दिला तरीही फिर्यादी या जेव्हा जेव्हा कामानिमीत्त बाहेर जायच्या तेव्हा आरोपीत याने नेहमी त्यांचे मागे मागे जावुन त्यांचा पाठलाग केला. तसेच दि २७/०२/२०२३ रोजी रात्री ११.३० वाजताचे सुमारास फिर्यादी यांच्या मावशीची मुलगी व तिचे ओळखीचे महीला यांनी मिळुन बंधन बँकेतुन बचत गटाकरीता कर्ज घेतले होते. त्यातील फिर्यादी यांचे मावशीची मुलगी हिने तिचा पुर्ण हप्ता भरला होता. तेव्हा तिने तिचे मैत्रीणीला तिचा हप्ता भरण्यासाठी फोनवरुन सांगितल्याचा तिला राग आल्याने मैत्रीणीने, माया व तिचा पती आरोपीत नामे सनी लोखंडे यांनी फिर्यादी यांचे घरासमोर येवुन वाद घातला होता. सदर वाद घालत असताना आरोपीत नामे सनी लोखंडे याने त्याचा गैर फायदा घेवुन कोणाचेही लक्ष नसताना जबरदस्तीने फिर्यादी यांचा हात ओढुन फिर्यादी यांना मिठी मारुन त्यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि मुळीक |

३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | रावेत १२०/२०२३ भाद वि कलम १४७,१४८,१४९,३२४,३२३,५०४,५०६, ३४ महाराष्ट्र पोलीस अधि कलम ३७(१) (३)/१३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२७/०२/२०२३ रोजी २३.३० वा.चे सुमा. राहते बिल्डींगचे पार्किंग मध्ये किवळे ता.हवेली जि.पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.२८/०२/२०२३ रोजी ०५.०९ वा. |
| फिर्यादी | :- | सुनिल रामचंद्र यादव वय ४६ वर्षे धंदा टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स रा ॲक्सीसा सोसायटी पलॅट नं.५०४ बी विंग किवळे ता.हवेली जि पुणे |
| आरोपी | :- | १)रमाकांत भगवान मोदगुल वय ३८वर्षे धंदा.खाजगी नोकरी रा.रुम नं .ऐ/३०४ ॲक्सीसा सोसा .साळुकेवस्ती किवळेगाव ता. हवेली .जि.पुणे ७०२०७४८८१२<br>२)साईनाथ शिवाजी विटकर वय ३१वर्षे धंदा. बिजनेस रा. विजयनगर काळे वाडी वाकड पुणे. ९५९५७५७५८३<br>३)ज्ञानदेव विलास क्षिसागर वय ३२वर्षे धंदा.टॅक्सकन्सल्ट रा.मोरया कॉलनी भोंडवेनगर वाल्हेकर वाडी चिंचवड ८८८८९०२७५४<br>४)गणेश ज्ञानेश्वर देवकर वय ३१ वर्षे धंदा. चार्टट आकाउंट रा. विजयनगर काळे वाडी वाकड<br>५)संकेत विठठल शिंदे वय २२वर्षे धंदा.चालक रा. विजयनगर काळे वाडी वाकड पुणे ७४९८५३५५००<br>६)पियुष पुर्ण नाव माहीत नाही रा. ए बिल्डीग ॲक्सीसा सोसायटी किवळे ता.हवेली जि.पुणे<br>**आरोपी अ.क्र .०१ ते ०५ यांना सी.आर.पी.सी. ४१ (अ) प्रमाणे नोटीस देण्यात आले आहे.आरोपी अ.क्रं ६ हा फरारी आहे.** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची पत्नी अश्विनी हिचे अंगावर धावुन गेल्याचा जाब आरोपी क्र १ यांना विचारल्याचे कारणावरुन आरोपी क्र १ व त्याचा मेव्हणा आरोपी क्र २ व ३ व त्याच मित्र आरोपी क्र ४ व ५ यांनी पिंपरी चिचंवड पोलीस आयुक्तालयाचे हददीत विधानसभा पोटनिवडनुकीचे अनुषंगाने जमावबंदी आदेश लागु असताना बेकायदेशिर गर्दी जमाव जमवुन प्लॅस्टीकचे पाईपने,फिर्यादी यांना हाताने व लाथाबुक्यानी मारहाण करुन तुम्ही तिघे सोसायटीचे गेटचे बाहेर कसे येता अशी दमदाटी करुन शिवीगाळ केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि पन्हाळे ९५१८३७२४८८ |

४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | पिंपरी २५१ /२०२३ भा.द.वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४, ४२७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २७/०२/२०२३ रोजीदुपारी ०२/०० वा. चे सुमारास मुनाफकलेक्शन समोर, पिंपरी बाजारपेठ, पिंपरी, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २८/०२/२०२३ रोजी १६.११ वा. |
| फिर्यादी | :- | इम्रान सादिक तांबोळी वय- ३६ वर्षे धंदा-चालक रा. घरनं. ९३२ स्वराजकॉलनी, नढेनगर, काळेवाडी पिंपरी, |
| आरोपी | :- | १) सोहेब पुर्णनाव पत्ता महित नाही वय २२ वर्षे अंदाजे<br>२) दानिश पुर्णनाव पत्ता महित नाही वय २३ वर्षे अंदाजे<br>३) इरफान पुर्णनाव पत्ता महित नाही वय २५ वर्षे अंदाजे<br>४) मुनाफ कलेक्शन पिंपरी, पुणे येथे काम करणारा रिंकुचा भाऊ पुर्ण नाव पत्ता माहित नाही<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे पत्नी व मुलांसह कपडे खरेदी करण्यासाठी पिंपरी बाजार पेठेत गेले असता मुनाफ कलेक्शन या कपडयाच्या दुकाना समोरुन जात असताना फिर्यादी यांचे तोंड ओळखीचा लहान मुलगा इम्रान शेख वय १४ वर्षे हा भेटला असता फिर्यादी यांनी त्यास तु मोहिन गॅरेज मधील काम का सोडले अशी विचारणा केली असता तो म्हणाला तुला काय करायचे तु जा त्यावेळी त्याचे ओळखिचे आरोपी क्र ०१ ते ३ यांनी काही एक कारण नसताना फिर्यादी यांना दादागिरी करतो काय असे म्हणुन शिविगाळ करुन हाताने मारहाण केली व आरोपी क्र ४ याने लोखंडी पाईप घेवुन फिर्यादी यांना शिविगाळ करुन लोंखंडी पाईपाने फिर्यादी यांचे उजव्या खांदयावर व डोक्यात तसेच डाव्या हाताच्या मनगटावर मारुन मला दुखापत केली. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा पवार ८१०८८९११४४ |

५.

पोस्टे व गु.रजि.नं. :- देहुरोड १६१/२३ भादवि कलम ३८०, ४५४, ४५७

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१२/०२/२०२३ रोजी ११:१५ वाजता ते दि.२८/०२/२०२३ रोजी ०८:०० वा.च्या दरम्यान सिग्नल रेजीमेंट ७८७ एडी ब्रिगेड कंपनीचे आर्मीचे स्टेशन हेडक्वार्टर जवळ के टी लाईन्स बिल्डींग मध्ये देहुरोड येथे

गुन्हा दाखल :- दि.२८/०२/२०२३ वेळ २०.१७ वा

फिर्यादी :- रामकृष्णा जनार्धनराव हडपा वय ३९ वर्षे व्यवसाय – नोकरी रा. अशोकनगर, बि.नं.२७१/७ ,आर्मी क्वार्टरर्स, देहरोड. ता.हवेली.पुणे.

आरोपी :- अज्ञात चोरटा

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे सिग्नल रेजीमेंट ७८७ एडी ब्रिगेड कंपनीचे आर्मीचे स्टेशन हेडक्वार्टर जवळ के टी लाईन्स बिल्डींगमध्ये असलेल्या एका स्टोअर रुम चा दरवाजा कडी कोयंडा कूलूप लावून बंद केला असताना तो कोणीतरी अज्ञात चोरटयाने स्टोर रूमचा कडी कोयंडा कोणत्यातरी हत्याराने तोडून ६८५००/- रुपये किंमतीचे सामान चोरून नेले आहे म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि थिटे ९९७०६६९८०९

६.

पोस्टे व गु.रजि.नं. :- दिघी ८३ /२०२३. भा.दं.वि कलम ३७९

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २७/०२/२०२३ रोजी दुपारी ०१/४५ वा. पासून ते सायं. ०३/४५ वा. चे दरम्यान साई मंदीरा समोरुन दिघी, पुणे. येथून

गुन्हा दाखल :- दि २८/०२/२०२३ रोजी २०/ ०४ वा.

फिर्यादी :- गिरीश गंगाराव कुरे वय-४२वर्ष, काम-नोकरी,रा-जी.के,पॅलेस सोसायटी बोराडेवाडी मोशी

आरोपी :- अज्ञात चोरटा

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची ३०,०००/- रु किंमतीची पॅशन प्लस मो सा नं एम एच २६ एस ४२६८ ही कोणीतरी अज्ञात इसमाने लबाडीच्या इरादयाने, स्वतःच्या आर्थिक फायदया करीता, फिर्यादीचे संमती शिवाय चोरी करून नेली आहे म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोना जाधव ९९२१७८७२७१

७.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ५९ /२०२३, भा.द.वि.कलम,२७९,३०४ (अ),३३७,३३८ मो वा काकलम १८४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०७/०२/२०२३ रोजी रात्रो १९.१५ चाकण ते वासुली फाटा भांबोली पोस्ट वासोली ता खेड जि

गुन्हा दाखल :- दि २८/१०/२०२२ रोजी २२/१५ वा

फिर्यादी :- सोमनाथ सोपान पिंजन वय ३९धंदाप्रिंटीग प्रेस राहणार मु भांबोली पोस्ट वासोलीताखेड जि पुणे

आरोपी :- शुभम शिवाजी भोर वय ३० वर्षे रा भोरवाडी वडगाव कांदळी ताजुन्नर जि पुणे **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने त्याचे ताब्यातील होन्डा कंपनीची हॉर्नेट मोटर सायकल एम एच १४ जे टी ५३२५ भरधाव वेगात अविचाराने हयगयीने रस्त्याचे परस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवुन फिर्यादीचे वडील नामे सोपान सिताराम पिंजन वय ७० वर्षे ,यांस जोराची धडक मारुन अपघात करुन अपघातात फिर्यादीचे वडीलांचे डोकीस गंभीरदुखापत करुन सदर अपघातात जबर जखमी होवुन औषध उपचार चालु असताना ते दि ११/०२/२०२३ रोजी ०४.४९ सुमारास मयत होणेस कारणीभुत झाला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- मपोउपनि भंडारवाड ९५४५६००९९९

८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड २०८ /२०२३ भा.द.वि.कलम ३६३ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २६/०२/२०२३ रोजी ११/०० वा. पासुन ते दिनांक २७/०२/२०२३ रोजी पहाटे ०४/०० वा. सुमारास सीओ- युवराज पंडीत, ज्ञानदीप कॉलणी, गणपती मंदीरा जवळ, थेरगाव, पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि २८/०२/२०२३ रोजी १९.३७ वा. |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी वय- ५२ वर्षे |
| आरोपी | :- | अज्ञात इसम,<br>संशयीत :- बिट्टु राजभर यादव वय- २१ वर्षे, रा. ग्राम धवव्या, पो. कठार जि. पंचमी चंपारण राज्य- बिहार सध्या- चांदतारा बेकरी, थेरगाव,पुणे.<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची मुलगी वय- १७ वर्षे, रा. सदर हिस फिर्यादी यांचे संमती शिवाय कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी फुस लावुन पळवुन नेली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि जगताप ९८२२९०९५१० |

९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिंचवड १०७/२०२३ भादवि कलम ४२०,४०६, ४६५,४६७, ४६८, ४७१ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०१/०६/२०११ रोजीते आज रोजी पर्यत सर्वेनं. १३३ हिस्सा नं,१, वाहेगुरु निवास, गुरुद्वाराचौक वाल्हेकरवाडी चिंचवड |
| गुन्हा दाखल | :- | दि.२८/०२/२०२३ रोजी १९/२८ वा. |
| फिर्यादी | :- | उमेश बाळकृष्ण पावणे वय - ३६ वर्षे, धंदा-नोकरी, रा सी,६०२ शुभं करोती अपार्टमेन्ट विद्या विनय निकेतन स्कुल जवळ, विशाल नगर चिंचवड पुणे. |
| आरोपी | :- | १) श्री राचपाल उर्फ रामपाल सिंग कोहली,<br>२) महीला फिर्यादी **आरोपी अटक नाही**. |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिक्राणी सन २०११ मध्ये मौजे चिंचवड वाल्हेकरवाडी येथील सर्वे नं. १३३ हिस्सा नं,१ या जमीन मिळकती मध्ये वाहेगुरु निवास या इमारतीत सदनिका विकण्यास असलेने फिर्यादी यांनी त्यामधील वाहेगुरु निवास या इमारती मधील दुस-या मजल्या वरील निवासी सदनिका क्र.सी ६ क्षेत्र ५०० चौ. फुट ( ४६.४६ चौ.मिटर ) ही सदनिका नमुद आरोपी यांनी बनावट कागदपत्रे तयार करुन ती खरी असल्याचे भासवुन सदरची सदनिका खरेदी करण्यास भाग पाडुन फिर्यादी यांची ११,७५,०००/-रु किंमतीची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि जाधव(गुन्हे) ९६८९७२४७२९ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | शिरगाव ६४/२०२३ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),२०(ब) (त्त)(ब), २९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २८/०२/२०२३ रोजी १६.३५ वा. पवना नदीच्या कडेला, तळेगाव पंप हाऊस शेजारी सोमाटणे गावठाण तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २८/०२/२०२३ रोजी २२/१४ वा. |
| फिर्यादी | :- | सदानंद विजय रुद्राक्षे, वय ३२ वर्षे, पोलीस शिपाई, ब. नं. २०९८, अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालय, |

| | | |
|---|---|---|
| आरोपी | :- | १)प्रविण रमेश शेडगे वय ३० वर्षे रा. घर नं.११४/ए सोमाटणे गावठाण, तळेगाव ता.मावळ जि.पुणे<br>२)मराठे मो.नं. ८२६२९७५७८४ पुर्ण नाव पत्ता माहिती नाही<br>**आरोपी क्र १ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ याने त्याचे कब्जात एकुण १,००,७५०/- रु. किं. चा ०४ किलो ३० ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या विक्री करीता कब्जात बाळगताना मिळुन आला. सदर गांजा हा आरोपी क्र २ याचेकडुन आणला असल्याचे सांगितले. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि येडे ९७६३७२७५२२ |

**११.**

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी १२४/२०२३ भा.दं.वि.कलम- ४४८,१४३,१४७,१४९,३२३,५०४,५०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २४/०२/२०२३ रोजी सायकाळी ०५/०० वा. चे सुमारास रो हाऊस नं.१०५ बि.नं.१९ तोरणा कृष्णा हौसि. सोसा.शिवसागर से.नं.२७ अ तोरणागड प्राधिकरण निगडी पुणे या ठिकाणी घडला असे |
| गुन्हा दाखल | :- | दि ०१/०३/२०२३ रोजी ००.५१ वा |
| फिर्यादी | :- | उमेश किसन महाजन वय ५६ वर्षे धंदा.नोकरी रा. १/१०१ शिवतिर्थ अपार्ट.जाधव कॉलनी बेलवली बदलापुर पश्चिम ठाणे |
| आरोपी | :- | १)स्वप्निल सुभाष कणसे रा.- रो हाऊस नं.१०५ बि.नं.१९ तोरणा कृष्णा हौसि. सोसा.शिवसागर से.नं.२७ अ तोरणागड प्राधिकरण निगडी पुणे.२)अमित हरिभाऊ शेवाळे पत्ता माहीत नाही ३)भुषण रविंद्र पाटील पत्ता माहीत नाही ४)अक्षय बाबुराव शिंगोटे पत्ता माहीत नाही ५)झांबरे पुर्ण नाव माहीत नाही<br>इतर ०४ ते ०५ अनोळखी सहकारी मित्र **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी क्रं १ याने दि सातारा सहकारी बॅक लि. शाखा-मालवणी मालाड येथुन सदर रो हाऊसवर जमीन/ इमारत तारण कर्ज रुपये ४० लाख घेवुन काही दिवस त्या कर्जाचे हफ्ते भरुन पुन्हा कर्जाचे हफ्ते भरणे बंद केले त्यामुळे बँकेने आरोपी क्रं १ यांनी कर्जाचे हफ्ते न भरल्याने सदर मिळकतीचा कायदेशीररित्या ताबा घेतला. सदर मिळकतीचा लिलाव केल्यांनतर आरोपी क्रं १ यांनी सदर मिळकतीमधील साहित्य त्यांना माघारी देण्यात यावे अशी विनंती केल्याने बँकेचे अधिकारी व कर्मचारी आरोपी क्रं १ यांना त्यांचे साहित्य माघारी देण्याकरिता मिळकतीच्या ठिकाणी गेले असता आरोपी क्रं १,२,३,४,५ व त्यांचे ०४ ते ०५ सहकारी मित्रांना सदर ठिकाणी बोलावुन घेवुन बॅकेचे अधिकारी व कर्मचारी यांना शिवीगाळ, धक्काबुक्की तसेच दमदाटी करुन मालमत्तेमधुन जबरदस्ती बाहेर काढले व मालमत्तेला असलेल्या कंपांउंडच्या गेटला स्वतःचे कुलूप लावुन सदर मालमत्तेवर बँकेचे वसुली अधिकारी यांचा कायदेशीर ताबा असताना सदर मालमत्तेवर त्यांच्या सहका-यांच्या मदतीने गैरमार्गाने बळजबरीने बेकायदेशीररित्या जबरदस्ती ताबा घेतला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि शेळके ७५२२९०७०७० |